दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २११ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२६ ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पेण शहरात परिवर्तन अटळ : खा.सुनील तटकरे

## उद्योजक यशवंत घासे, नगरसेवक निवृत्ती पाटील यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहरासह तालुक्यातील अनेक पक्षातील नेते कार्यकर्ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश करत असल्याने अगामी निवडणुकीत पेण शहरात परिवर्तन अटळ असल्याचे प्रतिपादन खासदार सुनिल तटकरे यांनी पेण येथे केले.



पेण येथील महात्मागांधी मंदिर येथे घेण्यात आलेल्या पक्ष प्रवेश कार्यक्रमात पेण येथील उद्योजक सामाजिक कार्यकर्ते यशवंत घासे, पेण नगरपालिकेचे नगरसेवक निवृत्ती पाटील, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा माजी अध्यक्ष संतोष आडसुळे यांनी खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे यांचे उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला.

या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकुर, पेण तालुका अध्यक्ष दयानंद भगत, शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकुर, उपाध्यक्ष विशाल बाफना, माजी नगराध्यक्ष संतोष श्रृगांरपुरे, जिल्हा युवक अध्यक्ष उदय जवके, परशुराम मोकल, विकास म्हात्रे, मंगेश नेने, गंगाधर पाटील, विकास पाटील आदि पदाधिकारी कार्यकर्तू उपस्थितीत होते.

पेण ला विकासाचे दृष्टीकोनातुन पुढे नेयाचे आहे. पेण शहरात राष्ट्रवादीची ताकद वाढली आहे. ओबीसीना आरक्षण मिळाले पाहीजे हे महाविकास आघाडीचे धोरण स्पष्ट आसल्याचे खासदार सुनिल तटकरे यांनी या वेळी सांगितले. विकास कामामुळे संघटनेला बळकटी मिळत आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यप्रणालीवर विश्र्वास ठेवुन अनेकजण पक्षात प्रवेश करत आहेत. शासनाचे योजनांचा लाभ जनतेपर्यत पोहचवायचा आहे. शहरातील वाढती लोकसंख्या पाहता येथील विविध प्रश्न सोडविण्याचा प्रयन्त करणार असल्याचे पालकमंत्री आदिती तटकरे यांनी या वेळी सांगितले. राष्ट्रवादी कॉंग्रेस व खासदार सुनिल तटकरे यांचे कार्यप्रणालीवर विश्वस ठेवुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला असुन पेण तालुका राष्ट्रवादीमय होणार असे या वेळी उद्योजक सामाजिक कार्यकर्ते यशवंत घासे यांनी या वेळी सांगितले. राष्ट्रवादी कॉंग्रेस रायगड जिल्हा ओबीसी सेल उपाध्यक्षपदी यशवंत घासे यांची या वेळी नियुक्ती करण्यात आली.

# उरण तालुका दोन घरफोड्यांनी हादरला ; १० लाखांचा ऐवज चोरीस

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात मागील तीन–चार दिवसांत दोन मोठ्या घरफोड्या झाल्या असून लाखो रूपयांचा ऐवज या वेळी चोरीला गेला आहे. एक घरफोडी २० ऑक्टोबर रोजी पागोटे गावात झाली तर दुसरी चोरी उरण शहरात काल २४ ऑक्टोबरला झाली. पागोटे येथिल घरफोडीत सुमारे ६ लाख ४२ हजार रूपये किंमतीचे दागिने आणि रोख रक्कम तर उरण येथिल चोरीत ४ लाख २२ हजार रूपयांचे दागिने आणि रोख रक्कम चोरीस गेली आहे.

पागोटे गावातील चंद्रकांत गजानन पाटील यांच्या घराचे दरवाजाचे ग्रील तोडून कपाटातील १,८०,०००/–रूपये किमंतीचे सोन्याचे गठण ४५ ग्रम वजनाचे कि.अ.१,००,०००/–रूपये किमंतीचे सोन्याची कानातील कुढी साखळीसह २५ ग्रॅम वजनाची कि.अ. ५०,०००/–रूपये किमंतीचे सोन्याची कानातील झुमके साखळीसह १२.५ ग्रॅम वजनाचे कि.अ. ६,०००/–रूपये किमंतीचे सोन्याचे सहा लहान मणी व तीन मोठे मणी १.५ ग्रॅम वजनाची कि.अ. १६,०००/–रूपये किमंतीचे सोन्याच्या ०.५ ग्रॅम वजनाच्या ८ अंगठया एकुण ४ ग्रॅम वजनाच्या कि.अ. १६,०००/–रूपये किमंतीचे सोन्याचे कानातील छोटे दोन टाप ४ ग्रॅम वजनाचे कि.अ. २०,०००/–रूपये किमंतीचे सोन्याची एक अंगठी ५ ग्रम वजनाची कि.अ. ३६,०००/–रूपये किमंतीचे सोन्याच्या तीन अंगठया प्रत्येकी तीन ग्रॅम वजनाच्या एकुण ९ ग्रॅम वजनाच्या कि.अ. १,००,०००/–रूपये किमंतीचे सोन्याचा एक नेकलेस २५ ग्रॅम वजनाचा कि.अ. ४०,०००/–रूपये किमंतीचे सोन्याचे कानातील दोन झुमके १० ग्रॅम वजनाचे कि.अ. ८,०००/–रूपये किमंतीचे सोन्याची नाकातील नथ २ ग्रम वजनाचे कि.अ. ४,०००/–रूपये किमंतीचे सोन्याचे लहान सहा मणी १ ग्रॅम वजनाचे कि.अ. ८,०००/–रूपये किमंतीचे सोन्याच्या दोन अंगठया एक ग्रॅम वजनाची प्रत्यकी अशा २ ग्रॅम वजनाच्या कि.अ. १४,०००/–रूपये किमंतीचे सोन्याच्या दोन ढवळया ३.५ ग्रम वजनाच्या कि.अ. २१,०००/–रूपये किमंतीचे चांदीचे आठ पैजन जोडे ३५० ग्रॅम वजनाचे या कि.अ. २३,५००/–रूपये रोख रक्कम एकुण६,४२,५००/–रूपये किंमतीचे सोन्या चांदिचे दागिने व रोख रक्कम तर उरण येथिल नलिनी जयराम घरत यांच्या घरातून १,३६,०००/– किंमतीचे सोन्याचे बाजुबंद १,३६,०००/–रू किंमतीचे सोन्याचा लहान हार ३४ ग्रॅम १,५०,०००/– रू रोख ४,२२,०००/– चोरट्यांनी चोरून नेला आहे. या चोरीची उरण पोलिस ठाण्यात तक्रार नोंदण्यात आली असून उरण पोलिस या प्रकरणाचा तपास करित आहेत.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ५ टक्के वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ५ टक्के वाढ करण्यात आली असून दिवाळीची भेट म्हणून अधिकाऱ्यांना ५ हजार रूपये तर कर्मचाऱ्यांना २५०० रूपये देण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ड.अनिल परब यांनी केली.

परिवहन मंत्री श्री. परब म्हणाले, या निर्णयाचा लाभ एसटी महामंडळाच्या सुमारे ९३ हजारांहून अधिक कर्मचारी–अधिकाऱ्यांना होणार आहे. विशेष म्हणजे प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला होणार पगार यंदा नोव्हेंबरच्या १ तारखेला म्हणजे दिवाळीपूर्वी

.../२

## संक्षिप्त...

### एकनाथ खडसे यांना सत्र न्यायालयाकडून दिलासा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री एकनाथ खडसे यांना पुण्यातील भोसरी जमीन घोटाळा प्रकरणी सत्र न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. खडसे यांना सत्र न्यायलयाने न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे.

शुक्रवारी मुंबई हायकोर्टाकडूनही खडसे यांना दिलासा मिळाला होता. हायकोर्टाने या प्रकरणासंदर्भात खडसे यांच्या अटकेला अंतरिम स्थगिती दिली. ही स्थगिती एका आठवड्यासाठी देण्यात आली होती.

जमीन घोटाळाप्रकरणी एकनाथ खडसे यांच्या डोक्यावर अटकेची टांगती तलवार आहे. या प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने अनेकदा चौकशी केलेली आहे. त्यानंतर अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी खडसे यांनी हायकोर्टाचा दरवाजा ठोठावला होता.

सन २०१६ मध्ये एकनाथ खडसे यांच्यावर ते फडणवीस सरकारमध्ये महसूल मंत्री असताना पुण्यातील भोसरी येथील एमआयडीसी जमीन खरेदीत गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही जमीन एकूण ३.१ एकर इतकी आहे. या जमीनीची एकूण किंमत ३१ कोटी इतकी असताना विक्री मात्र ३ कोटी ७ लाख रुपयांत झाल्याचा आरोप आहे.



भाजप नेत्या व राज्याच्या माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज (दि. २५) भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पनवेल निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील तसेच नगरसेविका व पदाधिकारी उपस्थित होते.

# पालिका कर्मचारी, पालिका शिक्षक, आरोग्यसेविका यांना सानुग्रह अनुदान मंजूर

## विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२०२१ च्या दीपावली सणानिमित्त पालिका अधिकारी, कर्मचारी, कामगार यांना सानुग्रह अनुदान मिळावे आणि सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करावी ही मागणी पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी पालिकेचे आयुक्त यांच्याकडे केली होती. पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत पालिका कर्मचारी, पालिका शिक्षक, आरोग्य सेविका यांना सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे.



भारताच्या सर्व सणांतील दिवाळी हा सण लोकांना आनंदाने,उत्साहाने भरपूर करतो. दीपावलीचे चार दिवस हा आनंद दुथडी भरून वाहतो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पालिकेत काम करणारे सर्व कर्मचारी वर्गास दीपावली सण गोड व्हावा याकरता सानुग्रह अनुदान देण्याची मागणी विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे, नगरसेविका डॉ सुरेखा मोहोकर, नगरसेविका प्रीती जॉर्ज, नगरसेविका सारिका भगत यांनी लेखी पत्राद्वारे केली होती. पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत पालिका कर्मचारी, पालिका शिक्षक, आरोग्य सेविका यांना सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे. या विषयाला सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळाल्याबद्दल विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी समाधान व्यक्त केले.

# गुन्हे शाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई ; ३७ हजाराचा मुद्देमाल जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुन्हे शाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाने खारघर व तळोजा येथे छापा टाकून सुमारे ३७ हजार ४६० रुपयाचा सिगारेट आणि तंबाखुजन्य पदार्थ हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सुरेश मेंगडे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, विनोद चव्हाण यांनी नवी मुंबई हद्दीत प्रतिबंधीत गुटखा व नशायुक्त पदार्थ विक्री व साठा करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. पोशि अर्जुन मनोहर पवार यांना त्यांचे गुप्त बातमीदारांकडुन मिळालेल्या बातमीची माहितीनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बासितअली सय्यद, पोउपनिरी. विजय शिंगे, सपोउपनिरी, इनामदार, पोहवा तायडे, पोहवा कांबळे, पोहवा उटगीकर सर्व नेमणुक अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई असे खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तळोजा गाव, स्टार हॉटेलच्या मागे, सुभान पटेल याच्या रुम मध्ये खारघर, नवी मुंबई येथे छापा टाकला. छापा टाकला असता रु.३७,४६०/– किंमतीचा

.../२

# कामोठे गावातील समस्या सोडविण्याची मागणी; सभागृह नेते परेश ठाकूर यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे गावातील विविध समस्यांबाबत नगरसेविका कुसुम रवींद्र म्हात्रे यांच्या वतीने पन–वेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांना निवेदन दिले आहे.



कामोठे गावातील अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. या रस्त्यांवर जागोजागी लहान–मोठे खड्डे पडलेले आहेत. याबाबत नागरिकांनी रस्ता दुरुस्तीसंदर्भात माझ्याकडे अनेक वेळा तकारी केल्या आहेत. तसेच अनेक समस्या उद्भवत आहेत. कामोठे गावात नव्याने रस्ता क्रॉंक्रिटीकरण करण्यात यावा. अनेक ठिकाणी हा रस्ता खचलेला आहे. त्यामुळे नागरिकांना पायी चालणे ही कठीण होत आहे. मागील काही दिवसांत पाऊस पडल्याने पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले होते. या वेळी नागरिकांनी रस्ता दुरुस्तीसंदर्भात अनेक वेळा तकारी केल्या आहेत.

याचप्रमाणे येथील ड्रेनेज सुध्दा अनेक ठिकाणी खचलेला आहे. ड्रेनेज नव्याने तयार करण्यात यावे. रस्ता तयार करताना रस्त्यामधुन जाणार्या ड्रेनेज विट बांधकाम न करता सिमेंटचे पक्के बाधकाम कॉंक्रिटी बॉक्स करण्यात यावे. पाण्याची नव्याने पाइपलाइन टाकण्यात यावी. त्यांचसोबत रस्ता कॉंक्रिटीकरण झाल्यानंतर नव्याने लाईटच्या वायार व नवीलाईटचे पोल टाकण्यात यावे. रस्त्याची कामे संबंधित खात्याच्या अंतर्गत तातडीने करण्यात यावी व कामोठ्यातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यात यावे, असे नगरसेविका कुसूम म्हात्रे यांनी निवेदनात नमुद केले आहे.

# नागोठण्याजवळ घरफोडीत दिड लाखांचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुंढाणी (ता.पेण) येथील घराची बंद खिडकी तोडून घरफोडी केल्याची घटना २३ ऑक्टोबर रोजी रात्री अकरा ते २४ ऑक्टोबर रोजी रात्री अकरा वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.

यासंदर्भात उपलब्ध माहितीनुसार बंद अस–लेली खिडकी उपटून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करुन रोख रक्कम व दागिन्यांसह एकूण १ लाख ५४ हजारांचा ऐवज चोरुन नेला. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घरफोडी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांच्या मुंढाणी, पो. बेणसे, ता. पेण येथील राहत्या घरात ही घरफोडी केली. घराच्या बेडरुममधील बंद खिडकी उपकून त्यावाटे चोराने आत प्रवेश केला आणि रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ५४

.../२

# श्रीवर्धन शहराला दिलेला शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रश्न वर्षभरात पूर्णत्वास येणार : खा. सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहराला शुद्ध पिण्याचे पाणी देईन आसा शब्द दिला होता. त्याच काम येत्या वर्षभरात पूर्णत्वास येणार असल्याचा विश्वास खा. सुनील तटकरे यांनी व्यक्त केला. शिवसेनेच्या माजी नगरसेविका राजश्री मुरकर यांच्या पक्षप्रवेश कार्यक्रम प्रसंगी श्रीवर्धन नावीपेठ येथे ते बोलत होते. यावेळी श्रीवर्धन मतदार संघ अध्यक्ष महंमद मेमन, तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, नगराध्यक्ष फैसल हुर्जुक, उपनगराध्यक्ष यशवंत चौलकर ,शहराध्यक्ष जितेंद्र सातनाक, डॉ अबू राऊत,हिदायत कुदृते , हरेश्वर सरपंच अमित खोत, आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना रेवस रेड्डी महामार्गाचे काम लवकरच सुरू होईल. त्यामध्ये पालकमंत्री आदिती तटकरे यांनी एक छान कल्पना मांडली आहे.

.../२

# सेशन कोर्टाचा समीर वानखेडेंना धक्का ; साक्षीदारा विरोधातील अपील अधिकारात नसल्याने फेटाळले

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एनसीबीच्या समीर वानखेडेंना सेशन कोर्टाने आज मोठा धक्का दिला आहे. आर्यन खान प्रकरणातील महत्वाचा साक्षीदार पलटल्याने त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी एनसीबीने सेशन कोर्टात आज सकाळी केली होती. यावर कोर्टाने या साक्षीदाराविरोधात निर्णय देण्याचे आपल्या अधिकारात येत नसल्याचे सांगत ही मागणी फेटाळली आहे.

प्रभाकर साईल यानं क्रूझ पार्टीवरील कारवाईवेळी आपण किरण गोसावीसोबत उपस्थित होतो आणि प्रकरणाचा साक्षीदार म्हणून माझ्याकडून कोऱ्या कागदावर सह्या घेण्यात आल्याचा खळबळजनक दावा केला आहे. त्यामुळे एनसीबीची आता मोठी कोंडी झाली आहे. तसेच समीर वानखेडेंना २५ कोटींपैकी ८ कोटी रुपये दिले जाणार होते. सॅम नावाच्या व्यक्तीशी गोसावीची भेटही झाली होती. ते एका निळ्या कारकडे गेले, त्या कारमध्ये शाहरुख खानची मॅनेजर पूजा ददलानी देखील होती असा दावा प्रभाकरने केला आहे. याचे ॲफिडेविट त्याने कोर्टात दाखल केले आहे.

साक्षीदाराने केलेल्या आरोपावर समीर वानखेडे सोमवारी सकाळी सेशन कोर्टात गेले होते. त्याठिकाणी वानखेडे यांनी प्रभाकर साईलने कोर्टात तक्रार का केली नाही? असं म्हटलं आहे. प्रभाकर साईलनं २२ दिवसांनी हा आरोप का केला? असा सवाल समीर वानखेडे यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करत विच–ारला होता. तसेच वारंवार माझ्यावर वैयक्तिक हल्ले

.../२

# वादाची 'भाषा' कशामुळे?

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) दहावी आणि बारावीच्या पहिल्या टप्प्याच्या परीक्षांत हिंदी आणि इंग्लिश वगळता अन्य भाषा विषयांचा समावेश दुय्यम (मायनर) गटात करण्यात आल्याने निर्माण झालेला वाद दुर्दैवी आहे. पंजाबी भाषेचा समावेश मुख्य (मेजर) गटात नसल्याने त्या भाषेवर अन्याय झाल्याचा आरोप करून पंजाबचे मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांनी सीबीएसईच्या निर्णयाला विरोध केल्यानंतर वादाला तोंड फुटले. त्या त्या विषयांच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि परीक्षा घेण्यासाठीची व्यवस्था यांचाच विचार करून 'मेजर' आणि 'मायनर' अशी विषयांची वर्गवारी करण्यात आला आहे; कोणत्याही विषयांना दुय्यम स्थान देण्याचा हेतू त्यात नऊ, असा खुलासा सीबीएसईने केला आहे; परंतु वादाचा धुरळा अद्याप खाली बसलेला नाही. मराठी, पंजाबी, कन्नड, तमीळ आदींपैकी कोणत्याही भाषा विषयांच्या विद्यार्थ्यांची संख्या हिंदी विषयाच्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी असणार यात शंका नाही. त्यामुळे सीबीएसईचा खुलासा पटण्यासारखा आहे; परंतु विषयांची 'मेजर' आणि 'मायनर' अशी वर्गवारी केल्याने, 'मायनर' वर्गातील विषय दुय्यम असल्याची भावना निर्माण होणे साहजिक आहे. त्यामुळे 'मेजर'-'मायनर' अशी वर्गवारी न करता पहिला गट, दुसरा गट अशी वर्गवारी केली असती, तर कदाचित वादच निर्माण झाला नसता. भाषिक अस्मिता हा महत्त्वाचा मुद्दा असून, तो अतिशय संवेदनशीलतेने हाताळायला हवा. त्याकडे जाणता किंवा अजाणता दुर्लक्ष झाल्यास वाद निर्माण होतात. सीबीएसईने आणि केंद्रीय यंत्रणांनी ताज्या प्रकरणातून धडा घेण्याची गरज आहे. वेगवेगळ्या कारणांनी असे वाद उद्भवत राहणे भारतासारख्या बहुभाषक देशाला परवडणारे नाही. देशाला एकच भाषा असावी, असे वाटणारा एक वर्ग भारतात आहे. हिंदी ही देशातील मोठ्या लोकसंख्येची भाषा असल्याने आणि ती जाणाऱ्यांची संख्या त्याहून अधिक असल्याने तिला झुकते माप देण्याचा प्रयत्न सातत्याने होत आला आहे. हिंदी ही राष्ट्रीय भाषा असल्याचा मुद्दाही वारंवार मांडला जातो. वास्तविक देशात बोलल्या जाणाऱ्या सर्व प्रमुख भाषा राष्ट्रीयच आहेत. हिंदी हीच देशाची मुख्य भाषा आहे, असा समज कोणाचा असेल, तर तो चुकीचा आहे. मराठीसह देशात बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषा तितक्याच महत्त्वाच्या आहेत. भाषिकदृष्ट्या संपन्न असलेल्या भारतावर एकच एक भाषा लादणे म्हणजे येथील भाषिक वैविध्याचा अपमान करणे आणि संघराज्याच्या संरचनेला तडा देणे. त्यामुळे असा प्रयत्न सुरू झाले, की प्रतिक्रिया उमटतात. साठच्या दशकात तमिळनाडूत हिंदीच्या विरोधात झालेल्या दंगली असोत, की अगदी अलीकडे नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात हिंदीची सक्ती करण्याचा प्रस्ताव असल्याची अफवा पसरल्यानंतर झालेला विरोध असो; हे सारे या प्रतिक्रियांचाच भाग आहेत. सीबीएसई परीक्षांबाबतचा ताजा वादही या प्रतिक्रियांचा एक भाग म्हणावा लागेल. सीबीएसईने परीक्षेच्या प्रशासनाच्या दृष्टिकोनातून विषयांची वर्गवारी केली हे खरे असले, तरी हिंदी आणि इंग्लिश सोडून अन्य भाषांना दुय्यम स्थान मिळाल्याचा संदेश त्यातून गेला, हे नाकारता येणार नाही. त्यामुळे भाषांबाबत असा चुकीचा संदेश जाणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. या वादाच्या निमित्ताने शिक्षणातील भाषा विषयांचे स्थान आणि आपल्या भाषेखेरीज अन्य भारतीय भाषा शिकण्याचा मुद्दा ऐरणीवर यायला हवा; परंतु भाषिक अस्मितेचे जसे राजकारण करता येते, तसे या मुद्द्याचे होत नसल्याने त्याची व्यापक चर्चा होण्याची शक्यता नाही. मातृभाषेतील शिक्षण सर्वाधिक परिणामकारक असल्याचे शिक्षणतज्ज्ञ सांगत असले, तरी इंग्लिश माध्यमाचे आकर्षण वाढत चालले आहे. परिणामी सुमार दर्जाच्या खासगी इंग्रजी शाळांचे पेव फुटले आहे. अशा शाळांतील विद्यार्थी मातृभाषा आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत उत्तमरीत्या व्यक्त होऊ शकत नसल्याचे विविध पाहण्यांतून समोर आले आहे. इंग्रजी हा विषय चांगल्या पद्धतीने शिकवणाऱ्या प्रादेशिक भाषांच्या माध्यमातील शाळा ही खरी गरज आहे. नवीन शैक्षणिक धोरणानेही प्रादेशिक भाषांवर भर दिला आहे; परंतु याची पूर्तता होण्याची शक्यता कमी असल्याचे आजवरच्या अनुभवांतून दिसते. प्रत्येक भारतीयांनी दुसरी एखादी भारतीय भाषा शिकावी, असे नमूद करून साने गुरुजींनी आंतरभारतीची संकल्पना मांडली होती. याची आजच्या काळात अधिक आवश्यकता आहे. त्याची पूर्तता करण्यासाठी धोरणात्मक पावले उचलायला हवीत. नव्या शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीची तयारी सध्या सुरू आहे. त्यातच याचाही समावेश करायला हवा. हिंदीसह सर्व भारतीय भाषांना समान प्राधान्य देण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करायला हवा. आपल्यावर हिंदी लादली जात नसल्याची, तसेच आपल्या भाषेलाही महत्त्व दिले जात असल्याची भावना अशा सर्व प्रामाणिक प्रयत्नांतून निर्माण होईल. सीबीएसई परीक्षेतील भाषा विषयावरील वादाच्या मुळाशी असलेल्या या सर्व मुद्द्यांना न भिडल्यास असे वाद सातत्याने निर्माण होत राहणार.

# कळंबोली येथील आनंद मंगल सोसायटीमधील नागरिकांचा शिवसेनेत प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**



शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख तथा राज्याचे पर्यावरण, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली व पनवेल विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नाने कळंबोली येथील आनंद मंगल सोसायटी सेक्टर-१० येथील शेकडो पुरुषांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

या वेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत साहेब यांनी सर्वांच्या हाती शिवबंधन बांधून पक्षात स्वागत केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेना पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, उपतालुका संघटक आबासो लकडे, शहर समन्वयक गिरीष धुमाळ, शहर प्रमुख डी. एन. मिश्रा, शहर संघटक अक्षय साळुंखे, अरविंद कडव उपशहर प्रमुख नारायण फडतरे, विभाग प्रमुख महेश गुरव, आकाश शेलार आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग शिक्षक अंकुश जाधव सलग तीन ३ वेळा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील निवी गावचे सुपुत्र व रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील शामल मोहन पाटील एज्यु. सोसायटीचे संस्थापक - अध्यक्ष सतीश मोहन पाटील यांच्या न्यू इंग्लिश स्कूल कळंबोली विद्यालयात गेली १६ वर्षे कार्यरत असणारे दिव्यांग शिक्षक अंकुश नथूराम जाधव यांना विविध संस्थांकडून सन २०२१ या वर्षात सलग तीन वेळा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .

अंकुश जाधव हे एक दिव्यांग शिक्षक असून अत्यंत बुद्धिमान , प्रामाणिक, कष्टाळू व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन श्री साई प्रतिष्ठान पुणे , राष्ट्रीय काव्यांगण लेखणीचे साहित्य मंच तथा सामाजिक संघटना, आणि आज नुकताच राजनंदिनी बहुउद्देशीय संस्था आणि श्री राजपूत करणी सेना जळगाव आदी सामाजिक संस्थांनी आदर्श शिक्षक पुरस्कारानी त्यांना गौरवीले आहे.

आज त्यांच्यावर सर्व स्थरातून, सहकारी अध्यापक वृंद, त्यांचे लाडके विद्यार्थी, पालक, मित्र परिवार, निवी ग्रामस्थ, नातेवाईक यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे . कौतुक होत आहे. त्यांच्या भावी कार्यास भरभरून शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे.

# विकासात्मक धोरणांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडे जनतेचा वाढता कल : खा. सुनिल तटकरे

**दै.रायगड नगरी । तळा**

आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या पाश्वभुमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि रायगडचे कार्यसम्राट खा.सुनील तटकरे यांनी कुठल्याही परिस्थितीत रायगड जिल्हा परिषद शिवतीर्थ आणि तालुक्यांतील पंचायत समितीवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आणण्यासाठी व्युहरचना आखली असुन प्रचाराची सुरवात आपल्या श्रीवर्धन मतदार संघातील बालेकिल्ला असलेल्या तळा तालुक्यातुन केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि.२४/१०/२१ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मेळावा गो. म.वेदक विद्या मंदिर येथे घेण्यात आला या मेळाव्यामध्ये शिवसेना, भाजप, शेकाप पक्षातील अनेक पदाधिकारी यांचा जाहीर प्रवेश घेत तळा तालुक्यातील आपली पकड अजून मजबूत केली आहे.या मेळाव्यासाठी तालुका अध्यक्ष नाना भौड, राजीप महिला व बालकल्याण सभापती सौ. गीता जाधव, पंचायत समिती सभापती सौ. अक्षरा कदम उपसभापती गणेश वाघमारे, राजिप सदस्य बबन चाचले, मंगेश देशमुख हीराचंद तांबे युवक अध्यक्ष नागेश लोखंडे शहर अध्यक्ष महेंद्र कजबजे,



नगरसेवक चंद्रकांत रोडे चंद्रकांत भोरावकर मंगेश शिगवण, ॲड.उत्तम जाधव राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तळा तालुक्याच्या निर्मीतीनंतर या तालुक्यावर राष्ट्रवादी काँग्रेसची मजबुत पकड आहे केवळ नगरपंचायीमध्ये या पक्षाला अपयश आले होते. विकासकामांचा झंझावात खा.तटकरे यांनी टिकवुन ठेवल्यामुळे विरोधकांना येथे संधीच नसल्याचे बोलले जात आहे तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावीत होउन तालुक्यातील स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष भास्कर कारे यांच्यासह शिवसेना, भाजप, शेकाप पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये जाहीर प्रवेश केला ग्रामीण भागातील शिवसेना नेत्यांची राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश घेण्याची जणुकाही स्पर्धाच सुरु होती.आगामी राजिप आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पाशर्वभूमीवर प्रत्येक आठवड्याला विकासकामांची भुमीपूजन आणि ऊदघाटन त्याचबरोबर पक्षप्रवेश मेळावे राष्ट्रवादीकडुन होत आहेत त्यामुळे विरोधकांनी त्याचा धसका घेतला आहे.

यावेळी खा.सुनिल तटकरे यांनी मार्गदर्शन करताना सर्वधर्म समभाव,बंधुत्व जपत शहराबरोबरच गाववाड्यांचा विकास गेली तीस ते पस्तीस वर्षे अविरत करत आहे. काही जुने सहकारी दुसऱ्या विचारधारेशी जोडले गेले होते परंतु ते आज राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर आले आहेत त्यांचे मी स्वागत करतो, भास्कर कारे यांनी २०१४ सालि युवकांच्या संघटनेची स्थापना केली सामाजिक स्तरावर चांगले काम केले परंतु त्याला राजकारणाची जोड असणे गरजेचे आहे कारे आणि त्यांचे सहकारी यांनी आज घेतलेला निर्णय योग्य असल्याचे सांगून संघटनेला बळकटी देण्याचे काम सुनील तटकरे करेल असे यावेळी आवर्जून सांगितले. शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार जपत सत्ता असो वा नसो राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मध्यमातुन जनतेचा सर्वांगीण विकास करीत आ-होत आणि भविष्यात करीत राहणार असे सांगताना दिवाळी पूर्वीच तळा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस ने फटाके फोडले असल्याचे त्यांनी सांगितले सुनिल तटकरे यांनी पुढे बोलताना १९९२ सालि जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असल्यापासून क्रितेक वर्ष मतदार संघाचा खुंटलेला विकास करण्याचे भाग्य लाभले आहे.

जनतेनी मला आपला नेता म्हणून स्विकारले त्या जनतेचे प्रश्न सोडविणे मी माझे कर्तव्य समजतो धर्माच्या जातीपातीच्या नावावर राजकारण करून कधीही मते मागितली नाही आणि मागणार ही नाही असे सांगताना माजी केंद्रीय कृषीमंत्री तथा पक्षाचे राष्ट्रिय अध्यक्ष शरद पवार साहेबांच्या पुरोगामी विचारांमुळेच आज कित्येक महिलांना राजकारणात विविध पदांवर काम करण्याची संधी मिळत आहे असे सांगितले राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या सर्व मान्यवरांचे त्यांनी शाल घालून स्वागत केले व प्रत्येकाला पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी जवाबदारी दिली जाईल असे यावेळी सांगितले.या पक्ष मेळाव्यात स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष भास्कर कारे व त्यांचे सहकारी त्याचप्रमाणे शिवसेना विभाग प्रमुख अशोक राणे, बोरघर हवेली सरपंच सौ.कदम, संदीप मुंढे, आत्माराम शेलार, यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ५ टक्के वाढ

होणार आहे. एसटीच्या कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होण्यासाठी सकारात्मक सहकार्याबद्दल मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री श्री.अजित पवार यांचे श्री.परब यांनी आभार मानले.

महागाई भत्त्यात वाढ करावी, अशी कर्मचाऱ्यांची मागणी होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या कर्मचाऱ्यांना १२ टक्के महागाई भत्ता मिळत आहे, त्यात आणखी ५ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आता १७ टक्के होणार असल्याचे श्री. परब यांनी यावेळी सांगितले.

## गुन्हे शाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई ; ३७ हजाराचा मुद्देमाल जप्त

विमल पानमसाला, सुंगधी तंबाखू, गुटखा मिळुन आल्याने आरोपी मेमुजफ्फरमुराद धोंगरे, वय २९ वर्षे, यास ताब्यात घेउन खारघर पोलीस ठाण्यामध्ये गु.र. क ३६१/२१ भारतीय दंड सहिंता १८६० कलम १८८, २७२, २७३, ३२८ सह अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६ चे कलम २६, २७ अन्वये गुन्हा दाखल करुन नमुद आरोपीस अटक केलेली आहे. त्याचप्रमाणे कळंबोली पोलीस ठाणे हददीत सेक्टर १० ई, संदीप पान शॉप मधुन विदेशी सिगारेट ६०००/-रू किंमतीचे मिळुन आल्याने पान शॉप चालक संदीपकुमार राम केलावन गुप्ता याचे विरूध्द कळंबोली पोलीस ठाणे गु.रजि.नं २९४/२०२१ सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थ (जाहिरातीस प्रतिबंध आणि वाणिज्य, व्यापार निर्मीती, पुरवठा, वितरण) अधिनियम, २००३या कायदयाच्या कलम ७ (३),२०(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचेकडून अंमली पदार्थ व गुटखा विक्री विरोधात विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

## नागोठण्याजवळ घरफोडीत दिड लाखांचा ऐवज लंपास

हजार ७०० रुपयांचा ऐवज चोरुन नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी नागोठणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर अज्ञात चोराविरोधात भा.दं.वि.क. ३८०, ४५७ प्रमाणे चोरी व घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी नागोठण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अरुण भिसे हे अधिक तपास करीत आहेत.

## पिण्याच्या पाण्याचा प्रश्न वर्षभरात पूर्णत्वास येणार : खा. सुनील तटकरे

हा मार्ग फक्त प्रवासासाठी रस्ता म्हणून नसावा तर त्याच्यावर ऐतिहासिक पाऊलखुणा दर्शविणाऱ्या अनेक काही गोष्टी कराव्यात या दृष्टीने भवितव्याच्या कालावधीत काम करणार असल्याचं वक्तव्य केले. शुद्ध पिण्याचं पाणी शहरामध्ये येण्याची ताजबीज येत्या वर्षभरात होईल असा ठाम विश्वास देखील या कार्यक्रम प्रसंगी तटकरे यांनी व्यक्त केला.

यावेळी जीवन्यातील व भरडखोल येथील अत्याधुनिक मच्छिमारंच बंदर उभारणार असल्याची घोषणा देखील खा. तटकरे यांनी केली. या प्रस्तावाला अस्लम शेख मंत्री यांनी प्रशासकीय मंजुरी दिली असून आता नजीकच्या काळात हा प्रस्ताव दिल्लीला जाईल भारत सरकारक कडून निधी आणून अत्याधुनिक पद्धतीच बंदर नजीकच्या काळात जिवन्यात उभारलं जाईल. यावेळी बोलताना गेल्या पाच वर्षांत नगराध्यक्ष फैसल हुर्जुक, माजी जितेंद्र सातनाक यांनी व त्यापूर्वीच केलेली सेवा त्याच उत्तर श्रीवर्धन मधील जनता निवडणुकीत देईल. यावेळी माजी नगरसेविका मुरकर व त्यांच्या नवी पेठ येथील सहकारी महिलांनी केलेला प्रवेश हा नक्कीच शहरातील पक्षाची ताकद वाढवणारा असल्याचं मत यावेळी खा. सुनील तटकरे यांनी व्यक्त केले.

## सेशन कोर्टाचा समीर वानखेडेंना धक्का

करण्यात येत आहेत. मला धमक्या दिल्या जात आहेत. माझ्यावर राजकीय पक्षाचा दबाव आहे. माझ्यावर चुकीचे आरोप करुन बदनामी केली जातेय. ज्या महिलेसोबत माझा घटस्फोट झालाय तिच्यासोबतचा फोटो कुणाच्या परवानगीने व्हायरल करण्यात आले? एका घटस्फोटित महिलेलाही सोडलं गेलं नाही. इतक्या खालच्या पातळीवर आरोप होत आहेत असंही समीर वानखेडे यांनी म्हटले होते.

यावर सेशन कोर्टाने आर्यन खानच्या जामिनावरील याचिका आता हायकोर्टात दाखल झाली आहे. यामुळे या प्रकरणी आम्ही कोणताही आदेश जारी करू शकत नाही. आता हे प्रकरण आमच्या अधिकारात येत नसल्याने कोणतीही कारवाई करू शकत नसल्याचे उत्तर सेशन कोर्टाने एनसीबीला दिले आहे. एनबीटीने याची माहिती दिली आहे.

# लोकवस्त्यांच्या रहदारीसाठी स्वाक्षरी मोहिमेनंतर आंदोलन ; १० नोव्हेंबरला आमरण उपोषणाचा इशारा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शहरातील नागरिकांच्या रहद-ारीचा मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान कोणताही साकल्याने विचार करण्यात आला नसल्याकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांसह महाराष्ट्र सैनिकांनी स्वाक्षरी मोहिम राबविल्यानंतर आता बुधवार, दि. १० नोव्हेंबर २०२१ रोजी मनसे शहरअध्यक्ष दर्पण दरेकर यांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. राष्ट्रीय महामार्ग उपविभागाच्या उपकार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम यांना यासंदर्भात पोलादपूर शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी मनसेचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष चेतन उतेकर, पंकज उमासरे, दीपक चव्हाण, चंद्रहास नगरकर यांच्यासमवेत भेटून इशारावजा निवेदन दिले आहे.

पोलादपूर शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यामंदिर तसेच उच्च माध्यमिक प्रशालेच्या दोन इमारतींमध्ये आणि एका खासगी शाळेच्या इमारतीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी विद्यार्थ्यांना शाळांकडे जाण्याचा मार्ग सुकर होण्यासह ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानाकडे जाणारे भाविक, आनंदनगर, प्रभात नगर पूर्व व पश्चिम, जाखमाता नगर, भैरवनाथनगर या लोकवस्त्यांकडे जाणाऱ्या नागरिकांचा विचार चौपदरीकरणामध्ये करण्यात आला नसल्याकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे वेळोवेळी करण्यात आलेल्या पाठपुराव्याकडे राष्ट्रीय महामार्ग बांधकाम उपविभाग महाडकडून सातत्याने दूर्लक्ष केले जात आहे. यामुळे मनसेतर्फे स्वाक्षरी मोहिम राबविण्यात आली असता व्यापक प्रतिसाद मिळाल्याने या समस्यांच्या पाठपुराव्याबाबत जनमत तीव्र असल्याचे स्पष्ट झाले आहे, असे मनसे शहरअध्यक्ष दर्पण दरेकर यांनी या निवेदनाद्वारे सरकारला अवगत केले आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर व्हेइक्युलर आणि कॅटल अंडरपास सुविधेची तसेच अन्य मागण्यांसंदर्भात पाठपुरावा करण्यासाठी हे आमरण उपोषणाचे आंदोलन छ.शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा येथे बुधवार, दि. १० नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी साडेअकरा वाजता छेडण्याचा निर्धार मनसे शहरअध्यक्ष दर्पण दरेकर यांनी केला असून या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग उपविभागाची राहिल, असे या निवेदनाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

# जिल्हा अग्रणी बँक तर्फे दि.२७ ऑक्टोबर रोजी कर्जत येथे महाकर्ज मेळाव्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

वित्तीय सेवा विभाग, भारत सरकार आणि जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया रायगड तर्फे बुधवार, दि. २७ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत रॉयल गार्डन, कर्जत, ता.कर्जत येथे भव्य कर्ज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कर्ज मेळाव्यात कर्जत शहर परिसरातील सर्व सरकारी, खाजगी आणि सहकारी बँका सहभागी होणार आहेत. तसेच कर्ज मेळाव्यामध्ये छोट्या व्यवसायिकांना मुद्रा योजनेंतर्गत शिशु कर्ज, हातगाडी वाले, रस्त्यावर बसून व्यवसाय करणारे यांच्यासाठी प्रधानमंत्री स्वानिधी योजनेंतर्गत कर्ज आणि विविध गृह कर्ज, वाहन कर्ज व शेतकऱ्यांना, मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांना, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय करणाऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत पीक कर्ज, छठ्ठड्च् आणि कर्जत नगर पालिका भागातील बचतगटांना समुदाय कर्ज, नवीन व्यवसाय करु इच्छिणाऱ्या होतकरू तरुणांसाठी जिल्हा उद्योग मार्फत PMEGP, CMEGP या योजनेंर्गत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत ३५ टक्के अनुदान असेलेले झचत्र्वए अंतर्गत कृषी कर्ज तसेच नाबार्ड चे कृषी पायाभूत कर्ज याबाबत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. याकरिता लागणारी कागदपत्रे पुढीलप्रमाणे :- अर्ज, आधार कार्ड किंवा पॅन कार्ड रेशन कार्ड, छायाचित्र, बँक पासबुक इत्यादी कागदपत्रे घेऊन आपले खाते ज्या बँक शाखेमध्ये आहे, त्या स्टॉलवर आपल्याला संबंधित कर्जाबद्दल अर्ज व मार्गदर्शन मिळेल. कर्जतमधील सर्व बँका एकाच छताखाली एकत्र येत असून कर्जत परिसरामधील नागरिकांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेऊन आपले व्यवसाय वृध्दिगत करावेत, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी यांनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# परतीच्या पावसाच्या हैदोसानंतर भात पिकांवर रानडुकरांची वक्रदृष्टी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात यंदा भातपिक पोटरीला येण्याच्या अखेरीस परतीच्या पावसाने झोड उठविल्याने संकटात असलेल्या भात पिकांकडे आता जंगली रानडुकरांची वक्रदृष्टी असल्याने भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले आहे.भातशेती कापणीला आली असतांना शेतात रानडुकरांचा हैदोस सुरू झाला आहे. त्यामुळे भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास कळपाने पिकांवर हल्ला करणारी रानडुकरे हिरावून नेत असल्याने रानडुकरांचा वनविभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी चिरनेर परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे.

पिकलेल्या शेतीची नासाडी करण्यासाठी येणाऱ्या रानडुक्करांना पळवून लावण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रभर शेतीची राखण करावी लागत आहे.

यंदा सुरुवातीला म्हणजे लावणीसाठी पाऊस उत्तम झाला मात्र त्यानंतर पिके पोटरीला येण्याच्या वेळेला पावसाने रंग दाखवायला सुरूवात केल्याने येथील शेतीवर गंडातर आले आहे ऐन वेलेला भात पिकांची कणसे बाहेर पडण्याच्या वेळेतच पावसाने मुसंडी मारुन हैदोस घातल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

पावसाचा लहरीपणा पण कायम राहिल्याने शेती व्यवसाय पूर्णपणे धोक्यात आला आहे दरम्यान परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतात जे काही पिकले होते. त्या पिकांचे ही नुकसान होऊ लागले आहे. तर बरीचशी शेती पाण्याखाली येऊन शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परतीच्या पावसापासून शेती वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर चिरनेर परीसरात काही भागातील भातशेतीवर पावसाचे छाया पसरल्याने दाणे न भरताच भात पोचट राहीले आहे. त्यातच पिकलेल्या शेतीची रानडुकरे नासाडी करु लागल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

## संक्षिप्त...

### श्रीवर्धनमध्ये नाम फाउंडेशनकडून मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या दोन शाळांना शालेय वस्तूचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक मदत म्हणून नाम फाउंडेशन या संस्थेकडून शालेय उपयुक्त साहित्य वाटप करण्यात आले. श्रीवर्धन तालुक्यातील ही पहिलीच मदत या संस्थेकडून देण्यात आली.

तालुक्यामध्ये गोखले एज्युकेशन सोसायटीच्या बोर्लीपंचतन येथील न्यू मॉडर्न इंग्लिश स्कूल तसेच श्रीवर्धनमधील कला वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय अशा दोन शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत. या शैक्षणिक संस्थेकडून नेहमीच शिक्षणाची उत्तम जबाबदारी पार पडत आहे. मात्र, यावर्षी अतिवृष्टीमुळे शालेय साहित्यांचे मोठे नुकसान झाल्याने विद्यार्थ्यांना नेहमीच हाताळणाऱ्या वस्तूंची कमतरता भासू नये यासाठी महाविद्यालय विकास समिती सदस्य नितीन सुर्वे यांनी नाम फाउंडेशन संस्थेकडे मागणी करत साहित्यांची मदत मिळवून दिली आहे.

आज प्रत्येक विद्यार्थी संगणकावर शिकू लागलेला आहे. या डिजिटल शिक्षणाने नव्या पिढीतील विद्यार्थी घडत आहे. याचा परिचय सर्वांना येऊ लागला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ववत होण्यासाठी नामांकित नाम फाउंडेशनकडून आवश्यक असणारे ६ संगणक, ३ प्रिंटर, ३ प्रोजेक्टर मशीन तसेच भौतिकशास्त्र प्रयोगशाळेमधील शैक्षणिक साहित्य देण्यात आले. हा वितरण सोहळा श्रीवर्धन येथील महाविद्यालयात नुकताच पार पडला. यावेळी गोखले एज्युकेशन संस्थेचे शाखा सचिव डॉ. एम. आर. मेश्राम यांनी नाम फाऊंडेशन चे संस्थापक प्रसिद्ध सिने अभिनेते नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे तसेच नामचे कोषाध्यक्ष राजीव सावंत यांचे ऋण व्यक्त केले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांनी प्राप्त झालेलं साहित्य विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास कामी उपयुक्त आहे असे मत व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष एस. बी. पंडित, सेक्रेटरी डॉ. एम. एस. गोसावी, झोनल सेक्रेटरी एस. एस. संत आणि एच आर डायरेक्टर दिप्ती देशपांडे यांनी नाम फाऊंडेशन च्या सामाजिक कार्याचे भरभरून कौतुक केले.




# सर्पमित्राकडून साप वाचवण्याचा संकल्प ; प्राथमिक रुग्णालयात शिबिरातून मार्गदर्शन



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे 'साप वाचवण्याचा संकल्प' या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन सोमवार दिनांक २५ रोजी करण्यात आले. सर्पमित्र टीम व आरोग्य विभाग यांच्या सयुक्तेने आयोजित शिबिरात नागरिकांना विविध माहिती देण्यात आली.

सापांविषयी असलेल्या गैरसमजामुळे साप दिसल्यावर त्याला मारण्यात येते. वास्तविक, साप हा पर्यावरणाच्या जीवनचक्रातील महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे लोकांच्या मनातील सापांची भीती दूर करण्यासाठी वैभव कदम व त्याच्या टीमने बोर्लीपंचतन प्राथमिक रुग्णालयात सोमवारी मार्गदर्शन शिबीर आयोजित केले. या शिबिरात साप वाचवण्याचा संकल्प करावा, असे आवाहन सर्पमित्रांतर्फे करण्यात आला.

गेल्या तीन वर्षापासून बिनविषारी, विषारी सापांचे जीव वाचविण्यासाठी बोर्लीपंचतन परिसरात सर्पमित्र टीम धडपडत आहे. टीमच्या मदतीने आतापर्यंत बोर्लीपंचतन परिसरातील २६० सापांना जीवदान दिले आहे. याच उद्देशाने गावावातून मार्गदर्शन शिबिर करण्यात येत असून येथील लोकांनी सर्पदंशाच्या भीतीने भयभीत होऊ नये.

अशावेळी रुग्णालयात तातडीने उपचार मिळेल याची माहिती आरोग्य विभागाकडून प्रामुख्याने या शिबिरात देण्यात आली. या शिबिरात वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज तढवी, ग्रामपंचायत सदस्य नंदकिशोर भाटकर व समाजसेवक शंकर गाणेकरसह स्नेक सेव्हर टीम उपस्थित होती.

# गिधाडांचे संवर्धन होणे अत्यावश्यक

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाड–म्हसळे –श्रीवर्धन सोसायटी ऑफ इको एन्डजाड्स्पिसिज कंझर्वेशन अँड प्रोटेकशन यांच्या माध्यमातून श्रीवर्धन येथे वनविभागाने जोपसलेली गिधाड्यांची पिल्ले पुन्हा त्यांच्या अधिवासात सुरक्षित सोडण्याचा उपक्रम म्हसळा तालुक्यातील भेकऱ्याचा कोंड येथे आयोजित करण्यात आला. राज्याचे मुख्य वनसंरक्षक –वनबल प्रमुख, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते संपन्न झाला.

या प्रसंगी राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक, वन्यजीव सुनिल लिमये, मुख्य वनसंरक्षक ठाणे एस. व्ही. रामराव, उपवनसंरक्षक रोहा अप्पासाहेब निकत, उपवनसंरक्षक अलिबाग आशिष ठाकरे, विश्वजित जाधव, मिलिंद राऊत, वनक्षेत्रपाल म्हसळा निलेश पाटील, महाराष्ट्र राज्य मानद वन्यजीव संरक्षक प्रेमसागर मेस्त्री, प्रशांत पाटील, आर. बी. साऊ, मोहन शिंदे, गजानन शिंदे, शंकर पाटील, किशोर गुलगुले, चिरगांव–बागाची वाडी –भेकऱ्याचा कोंड,पांगलोली वनसमिती व ग्रामस्थ, वनपाल संजय नाईकनवरे, वनपाल संजय गिरी, मेजर वाघे, शिंदे, गजानन लालछोटे,शशिकांत चेवरे, हरिराम बनसोडे, रुपेश देवरे, अतुल अहिरे, प्रियांका चव्हाण, चरण चव्हाण, अमोल सोनार, इंगोले, रामकृष्ण कोसबे आदि मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी आपल्या मार्गदर्शनात राज्याचे मुख्य वनसंरक्षक श्री. जी. साईप्रकाश यांनी रोहा वनविभागाचे कौतुक करून रोहा वनक्षेत्राची कामगिरी समाधान कारक असल्याचे सांगितले. रोहा वनविभागाअंतर्गत म्हसळा वनविभागाने हाती घेतलेला गिधाडसंवर्धन प्रकल्प निश्चितपणे उत्कृष्ठ असून अश्या माध्यमातून गिधाडांचे संवर्धन होणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. महाराष्ट्र राज्य मानद वन्यजीव संरक्षकप्रेमसागर मेस्त्री यांनीही गिधाड संवर्धत अतिशय मोलाची कामगिरी केल्याने त्यांचेही जेवढे कौतुक करावे तेवढे कमी असल्याचे जी. साईप्रकाश यांनी आवर्जून सांगितले . तीन महिने गिधाडांची पिल्ले सांभाळून पुन्हा त्यांच्या अधिवासात सोडणे हि बाब वनविभागाच्या दृष्टिने अतिशय महत्वाची असल्याचे उपवनसंरक्षक रोहा अप्पासाहेब निकत यांनी सांगितले.



# नागोठणे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेळेच्या आधी दिवाळी बोनसचे वाटप



**दै.रायगड नगरी । वाकण**

कोरोना काळातही नागोठणे शहरातील नागरिकांसाठी जिवाची पर्वा न करता सेवा बजावणाऱ्या नागोठणे ग्रामपंचायत मधील आपल्या कर्मचाऱ्यांना वेळेच्या आधी दिवाळी बोनसचे वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम नागोठणे ग्रामपंचायतीचे सरपंच डॉ.मिलिंद धात्रक, उपसरपंच मोहन नागोठणेकर व सर्व सदस्यांच्या उपस्थितीत सोमवार दि. २५ ऑक्टोबर रोजी राबविण्यात आला.

नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयातील कै. शैलेंद्र देशपांडे सभागृहात दिवाळी निमित्ताने सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान अर्थात दिवाळी बोनसचे वाटप करण्यात आले. यावेळी नागोठणे ग्रामपंचायतीचे सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, अखलाक पानसरे, अतुल काळे, सदस्या दिलनवाझ आधिकारी, भक्ती जाधव, रोजीना बागवान, माधवी महाडिक, मंगी कातकरी, मेघा कोळी तसेच ग्रामसेवक राकेश टेमघरे आदींसह नागोठणे ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

कोरोना काळात सुद्धा ग्रामपंचायत हद्दित मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू असून गावाचा विकास योग्य पद्धतीने सुरु आहे. असे असतांनाच या विकासात काही प्रमाणात का होईना सहभाग असणाऱ्या ग्रामपंचायतीच्या कर्मचारी वर्गाला दिवाळी बोनसचे वाटप करुन आम्हा कर्मचाऱ्यांचा आनंद द्विगुणीत करणारे नागोठणे ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व सर्व सदस्यांचे सर्व ग्रामपंचायत कर्मचारी वर्गाच्या वतीने आभार व्यक्त करीत असल्याचे यावेळी ग्रामपंचायतीचे कार्यालयीन निरीक्षक प्रमोद चोगले यांनी सांगितले.

# स्पर्धात्मक परीक्षेसाठी शिक्षकांना सुयोग्य मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील केंद्र शाळा तांबडी बु.येथे संपन्न झालेल्या केंद्रस्तरीय सहविचार सभेप्रसंगी शिक्षकवर्गाला स्पर्धात्मक परीक्षेसाठी तज्ञांकडून सुयोग्य मार्गदर्शन करण्यात आले.

या केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. पोटे यांनी केंद्रातील सर्व शिक्षकांची केंद्रस्तरीय सहविचार सभा आयोजित केली होती या सभेमध्ये स्पर्धात्मक परीक्षांसाठी विद्यार्थी घडवताना या विषयावर तज्ञमार्गदर्शक म्हणून त्यांनी शिक्षकवर्गाला संबोधित करताना केंद्रप्रमुख श्री. पोटे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच रा.जि.प.शाळा तळा दगडी शाळेतील शिक्षक सुनील बैकर यांनीही शिक्षकवर्गाला मार्गदर्शन केले.सुनील बैकर यांनी आपल्या सेवाकाळात १९ वर्षाच्या सेवेमध्ये १७ विद्यार्थी नवोदय परिक्षेसाठी उत्तीर्ण केले व २० विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र आहेत .

सुनील बैकर यांनी अतिशय उत्तम मार्गदर्शन करुन स्पर्धा परीक्षांमध्ये यश प्राप्त करण्यासाठी शिक्षकांची भूमिका स्पष्ट केली .तर त्यांच्या *माय– बाप फौंडेशन संस्थेला* तांबडी बु केंद्र परिवाराकडून आर्थिक मदत करण्यात आली.या कार्यक्रमाला तांबडी बु.केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थितांचे स्वागत श्री .पोटे सर यांनी केले व आभार वासकर सर यांनी व्यक्त केले.

# तळोजा एमआयडीसी येथे आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा एमआयडीसी येथील केमिकल पावडर साठा असलेल्या मोकळ्या गोडावून आग लागल्याने वावंजे परिसरातील जनतेमध्ये घबराट पसरली होती.

तळोजा एमआयडीसी मधील वावंजे येथील केमिकल पावडर साठा असलेल्या मोकळ्या गोडावूनला आग लागली. त्यामुळे मोठ्या वावंजे परिसरातील जनतेमध्ये मोठी घबराट पसरली होती. सदरची आग अग्नीशमन दलाच्या जवानांनी आटोक्यात आणली. यावेळी सुदैवाने कोणतीही हानी झाली नाही. आगीची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर, पोलीस उपनिरीक्षक भरत पाटील, संदीप कर्डीले, पो.हवा.डी.डी.पाटील, सरपंच तांडेल आदी ग्रामस्थ उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : धामणी, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरात नमूद असलेल्या जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : धामणी, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार रु. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.ओमकार अनंत म्हसकर | ३ | १८/क | ०.५०.५० पो.ख.०.०२.०० एकूण क्षेत्र ०.५२.५० गुंठे एवढ्या क्षेत्राबाबत | १.४४ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दि.२५/१०/२०२१

**सही/–**
**ॲड.सागर काशिनाथ कोंडीलकर**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**ऑफिस शॉप नं.२१, पहिला मजला नगरपालिका कॉम्प्लेक्स, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**



## सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.वसंत नथुराम नलावडे व इतर हे या सावधान नोटीशीद्वारे कळवितात की,

१) तुकडी व जिल्हा : रायगड, पोटतुकडी व तालुका : खालापूर हद्दीतील मौजे : हातनोली येथील मे.दुय्यम निबंधक, खालापूर यांचे अधिकार स्थळसिमेतील महसूल दप्तरी खालीलप्रमाणे वर्णिलेली आहे. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रामणे :–

**जमिनीचे वर्णन**

**मौजे : हातनोली, ता.खालापूर, जि.रायगड येथील**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ६९/१ अ | ०–८०–६ | ११.१२ |
| | पो.ख. ०–१२–३ | |
| | एकूण १–९२–९ | |

वरील मिळकतीचे गाव मौजे : हातनोली हे इनाम असल्यामुळे या मिळकतीचे पुर्वगामी मालक **श्री.कृष्णराव बाळासाहेब देशमुख** यांचेकडून आमचे अशिलांना सदरील मिळकत सोडण्यासाठी सतत दबाव येत होता. सदर मिळकत तिचे तथाकथित खरेदीदार श्री.महेंद्र कोटरीया यांनी आमच्या अशिलांना प्रलोभने दाखविली आणि दबाव टाकला. तसेच वेगवेगळी आश्वासने दिली. त्यामुळे आमचे अशिलांचे वडील **कै.नथुराम राघो नलावडे** यांच्याकडून दि.२२/१२/२०१० रोजी अत्यंत अल्प किंमतीत हे तथाकथित खरेदीखत करून घेतले. त्यानंतर **श्री.महेंद्र कोटरीया** यांनी सरकारी कागदपत्रकात फेरफार करून खोटी कागदपत्रके जोडून **फौजदारी स्वरुपाचे** बेकायदेशीर कृत्य करून जाणून बुजून फसवणूक करून खरेदीखत करून घेतल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. आणि श्री.महेंद्र कोटरीया आणि सदर मिळकतीचे पुर्वगामी मालक श्री.कृष्णराव बाळासाहेब देशमुख यांच्यामध्ये सद्यस्थितीमध्ये हातमिळवणी करून तडजोड करण्याचा प्रयत्न चालू असून आमच्या अशिलांचा सदर मिळकतीवरील हक्क कायमस्वरुपी संपुष्टात आणू पाहत आहेत. परंतु आम्ही तसे होवू देणार नाही.

त्यामुळे सदर वरील वर्णनाच्या मिळकतीच्या बाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार / करार यापुढे करू नये, तसेच **श्री.महेंद्र कोटरीया** यांचे ७/१२ सदरी नाव असल्याकारणाने त्याचा गैरफायदा ते घेत आहेत. तरी **श्री.महेंद्र कोटरीया** यांना या सावधान नोटीसीद्वारे जाहीर सक्त ताकीद देण्यात येते की, त्यांनी यापुढे या सावधान नोटीसमध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्याबाबत कोणताही करारमदार/व्यवहार करू नयेत, याउपर केल्यास त्यांस आमचे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. तसेच आम्हाला माहिती न देता वरील नमूद भूखंड धारक परस्पर अनधिकृतपणे अन्य त्रयस्थांबरोबर आमचे नुकसान करण्याच्या हेतूने खरेदीखत, फरोक्तखत, कुळमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, अथवा गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, कुळहक्क ताबा, हक्क, भाडेपट्टा, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध निर्माण होणारा दस्त तयार करण्याच्या प्रयत्न झाल्यास अथवा अशा प्रकारचा कोणताही दस्त केलेला असल्यास, तो संबंधतांनी त्वरित रद्द करावा आणि उपरोक्त नमूद खरेदीदाराने करार, व्यवहार दस्त केल्यास होणाऱ्या नुकसानीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाही. तसेच अशा प्रकारचा कोणताही करारमदार करणारे आमच्या अशिलांस होणाऱ्या नुकसानीस जबाबदार राहतील, याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

हे कळावे,

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/१०/२०२१

**सही/–**
**ॲड.शुभांगी केदार लाड**
**बी–१०१, रिद्धी सिद्धी को.ऑप.हौ.सो.,**
**पायोनिअर विभाग, स्वामी नित्यानंद मार्ग,**
**पनवेल–४१०२०६, जि.रायगड**
**मो.नं.९३२४४१६१०५**



ॲड.अमित सपकाळ

## जाहीर नोटीस

CMA १४०७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/१२/२०२१

१) सुवर्णा मधुकर लोखंडे
वय वर्षे : ५६, व्यवसाय : घरकाम
रा.बी–१२, रु.नं.०२, प्रबोधन हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१६, सेक्टर ११, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प.), जि.रायगड

२) सारिका प्रवीण धस्के
वय वर्षे : ३६, व्यवसाय : घरकाम
रा.निकाळजे प्लॉट नं.७, अजगर साळून,
सिद्धार्थ कॉलनी, चेंबूर (पू), मुंबई

३) पुष्पा मधुकर लोखंडे
वय वर्षे : ३४, व्यवसाय : नोकरी
रा.बी–१२, रु.नं.०२, प्रबोधन हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१६, सेक्टर ११, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प.), जि.रायगड

४) निखील मधुकर लोखंडे
वय वर्षे : ३०, व्यवसाय : नोकरी
रा.बी–१२, रु.नं.०२, प्रबोधन हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१६, सेक्टर ११, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प.), जि.रायगड

५) प्रफुल्ल मधुकर लोखंडे
वय वर्षे : २७, व्यवसाय : नोकरी
रा.बी–१२, रु.नं.०२, प्रबोधन हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१६, सेक्टर ११, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प.), जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार अनुक्रमे २, ३, ४ आणि ५ यांचे वडील कै.मधुकर श्रीपती लोखंडे हे दि.०५/०७/२०२१ रोजी क्रिटीकेअर हॉस्पिटल, कामोठे, पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ यांचे सासरे व अर्जदार अनुक्रमे २, ३, ४ आणि ५ यांचे आजोबा कै.श्रीपती तातू लोखंडे हे दि.१५/१२/२००७ रोजी मु.पो.राहुडे, ता.पाटण, जि.सातारा येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ यांची सासूबाई व अर्जदार अनुक्रमे २, ३, ४ आणि ५ यांची आजी कै.मुक्ताबाई श्रीपती लोखंडे हे दि.२७/०४/२०१० रोजी मु.पो.राहुडे, ता.पाटण, जि.सातारा येथे मयत झालेले आहेत. कै.मधुकर श्रीपती लोखंडे यांच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :–

**रा.बी–१२, रु.नं.०२, प्रबोधन हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१६, सेक्टर ११, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), जि.रायगड ४१०२०६**
**२६.११ चौ.मी. चटई क्षेत्र**

येणेप्रमाणे फ्लॅट मिळकतीचे वर्णन असून सदरहू फ्लॅट मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदाराने मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.मधुकर श्रीपती लोखंडे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आवश्यक कागदोपत्री पुराव्यासहीत मे.कोर्टात दाखल करावे. सदर मदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मे.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## बेपत्ता तरुणीच्या शोधात न्हावाशेवा पोलीस

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील फुंडे येथील तरुणी प्रणवी आकाराम राजगे (१८) फुंडे कॉलेज येथे एफवायबीए मध्ये प्रवेश घेण्याकरिता जातो असे सांगून गेली ती आजतागायत परत आलीच नाही.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार दि.६ ऑक्टोबर २०२१ रोजी उरण तालुक्यातील फुंडे येथील प्राईड व्हीला रूम न.१०१प्लॉट न.९९,सेक्टर – १५ येथील रहिवासी असलेली १८ वर्षीय तरुणी प्रणवी आकाराम राजगे ही उरण – पनवेल रोडवरील फुंडे कॉलेज येथे एफवायबीएला प्रवेश घेण्यासाठी जातो असे घरच्यांना सांगून गेली ती घरी आजतागायत परतलीच नाही. रंग सावळा,चेहरा उभट,केस काळे,कुरळे व लांब, नाक बसके, बांधा – मजबूत,अंगात नेसून पिवळ्या रंगाचा कुर्ता, लाल रंगाची लेगीज व काळ्या रंगाची ओढणी, पायात सँडल, उंची ५ फूट ५ इंच,भाषा – मराठी हिंदी बोलते,सोबत कॉलेज प्रवेशासाठी घरातून घेतलेले ३ हजार रुपये असे या तरुणीचे वर्णन असून या प्रकरणी न्हावाशेवा येथील महिला पोलिस हवालदार के.के.नाईक या अधिक तपास करीत आहे.वरील वर्णनाची तरुणी कोठे दृष्टीस पडल्यास तात्काळ न्हावाशेवा पोलिस ठाणे दूरध्वनी क्र.०२२२७४७२२६४ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## पनवेल परिसरातून २८ वर्षीय व्यक्ती बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील भिंगरी गाव नारायण परदेशी यांची रूम भिंगारीगाव ओएनजीसी येथे राहणार वसीम रशीद खान (वय ३५ वर्ष) हा व्यक्ती त्याच्या राहत्या घरातून घरातील व्यतीला कॉलीस कार घेऊन भाडे मारण्याकरिता जातो. असे सांगून निघून गेला आहे. मात्र अद्याप पर्यत्न घरी परातलाच नसल्याने अफसाना वसीम खान यांनी पनवेल शहर गाठत बेपत्ता असल्याची तक्रार दिली आहे. वसीम यांची उंची पाच फूट तीन इंच, रंग गोरा, अंगाने सडपातळ, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, मिशी नाही, दाढी नाही, उजव्या हाताच्या बोटांमध्ये चांदीचे अंगठी, व दावे हातामध्ये काळ्या रंगाचे घड्याळ, उजवाय हाताच्या मनगटाला, लाल रंगाचा धागा, अंगात निळसर रंगाची जीन्स पॅन्ट, व लाईट निळ्या रंगाचा फुल शर्ट पायात पावसाळा काळ्या रंगाचा बूट सोबत ओपो कंपनीचा मोबाईल त्यामध्ये सिम क्र. ८८९८४३७३१७ हा नामावर भाषा मराठी हिंदी अशा वर्णनाचा व्यक्ती कोठेही दिल्यास किंवा माहिती मिळाल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार एस.बी.पवार यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पेण -पनवेल मेमु साठी पेणकरांचा पुन्हा एल्गार ; ११ नोव्हेंबरला आत्मदहनाचा इशारा

## हिरवे झेंडे दाखविणारे नेते गेले कुठं ; समस्त पेणकरांचा सवाल

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण रेल्वे स्थानकातून पेण – पनवेल मेमु ही प्रवासी शटल रेल्वे सेवा पुन्हा पूर्ववत करण्यासाठी तसेच पेण व रोहा स्थानकातून एचण किंवा मेमु ही छत्रपती शिवाजी टर्मिनल व दादर, ठाणे, कल्याण, दिवा, वसई रोड व डहाणू रोड ही प्रवासी रेल्वे सेवा तातडीने सुरू करण्यासाठी निवेदन मध्य रेल्वे प्रशासनाला दिले आहे. या निवेदनातून समस्त पेणकरांनी तातडीने ही सेवा सुरू न केल्यास पेण – पनवेल मेमुच्या वाढदिवसाच्या दिवशी म्हणजेच ११ नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथील मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान यापूर्वी पेण – पनवेल शटल सुरू करण्यासाठी पेणकरांनी एकत्र येऊन मी पेणकर, आम्ही पेणकर नावाने समिती स्थापन करून उभालेल्या एल्गारमुळे ही सेवा सुरू झाल्यानंतर सर्वपक्षीय राजकीय पुढारी मात्र हिरवे झेंडे दाखविण्यात अग्रक्रमावर होते, मग हे पुढारी आता पुन्हा ही सेवा सुरू करण्यासाठी पुढे का सरसावत नाहीत असा संतप्त सवाल समस्त पेणकर करीत आहेत.

पेणकरांनी आंदोलने, उपोषणे केल्यानंतर ११ नोव्हेंबर २०१८ रोजी पेण – पनवेल शटल सेवा सुरू करण्यात आली, मात्र त्यानंतर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्वच रेल्वे सेवा बंद करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतल्यानंतर ही सेवा देखील बंद झाली होती, मात्र आता सर्व व्यवहार, सर्व सेवा पूर्वपदावर येत असल्याने आता ही बंद ठेवण्यात आलेली पेण – पनवेल शटल सेवा देखील पुन्हा सुरू करण्यात यावी. याचबरोबर पेण – पनवेल – दिवा व वसई रोड व डहाणू रोड ही प्रवासी मेमु रेल्वे सेवा देखील पुन्हा सुरू व्हावी, पेण – ठाणे ही प्रवासी रेल्वे सेवा शनिवार व रविवारी देखील उपलब्ध व्हावी, अलिबाग रेल्वे मार्ग प्रवासी मार्गासाठी सुरू करण्यात यावा, रोजच्या जलद सेमी व फास्ट, सुपर फास्ट सर्व रेल्वे गाड्यांना पेण स्थानकात थांबा मिळावा, गणपती व दिवाळी, होळी सुट्टी विशेष गाड्यांना पेण व रोहा रेल्वे स्थानकात दोन मिनिटांचा थांबा मिळावा, पेण, पनवेल, खोपोली, रोहा, कर्जत रेल्वे स्थानकात प्रवाशांना मूलभूत सुविधा मिळाव्यात, सर्व मध्य रेल्वे स्थानकात प्रवासी विश्रांती गृह, स्वयंसेवी संस्थेतर्फे प्रवासी नागरिक सहाय्यता केंद्र उभारावे आदी मागण्या पेणकर समितीने मध्य रेल्वेकडे निवेदनाद्वारे केल्या आहेत.

या मागण्या मान्य न केल्यास आम्हाला रेल्वेचे प्रवासी म्हणून जो हक्क मिळायला पाहिजे तो आपणाकडून मिळत नसेल तर आम्ही येत्या ११ नोव्हेम्बरला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथे सामूहिक आत्मदहन करणार असल्याचा इशारा पेणकरांच्या वतीने देण्यात आला आहे. लोकप्रतिनिधींची उदासीनता लक्षात घेता अखेर पेणकरांनी पुढाकार घेऊन समिती स्थापन करून आंदोलने, उपोषणे केली तेव्हा ही शटल सेवा सुरू झाली, मात्र यापूर्वी झोपी गेलेले सर्वपक्षीय राजकीय पुढारी शटल ला हिरवा झेंडा दाखवायला मात्र पुढाकार घेतला होता, मात्र कोरोना काळात बंद पडलेली ही शटल सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी कोणताही स्थानिक पुढारी अथवा लोकप्रतिनिधी पुढाकार घेत नसल्याने त्यावेळी हे हिरवे झेंडे दाखविणारे सर्वपक्षीय नेतेगण गेले कुठे, असा सवाल समस्त पेणकर करत आहेत.

सर्वत्र ट्रेन सेवा सुरू झाली आहे, आणि आता शासनाच्या आदेशानुसार शाळा, महाविद्यालये देखील सुरू झाली आहेत, त्यामुळे अतिशय सोयीस्कर प्रवास आणि खिशाला परवडेल असा रेल्वेचा प्रवास पुन्हा एकदा पेण मधील कामगार, जेष्ठ नागरिक, विद्यार्थी वर्ग यांना उपलब्ध करून देण्यासाठी रेल्वे प्रशासनाने पुढाकार घेणे आवश्यक आहे आणि रेल्वे प्रशासनाला शटल सेवा सुरू करण्यास प्रवृत्त करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, आणि नेत्यांनी पुढाकार घेणे देखील तेवढेच महत्वाचे आहे.

> मानव अधिकाराच्या माध्यमातून रेल्वे प्रवाशांना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे हे रेल्वे प्रशासनाचे काम आहे, मात्र विविध निवेदने देऊन, रेल रोकोचा इशारा देऊन, आंदोलने करून आणि प्रशासनासोबत चर्चा करून देखील आम्हा पेणकरांना हक्काच्या मूलभूत सुविधा मिळत नसतील तर आम्ही येत्या ११ नोव्हेंबर रोजी सामूहिक आत्मदहन करण्यावर ठाम आहोत.
>
> **योगेश म्हात्रे - अध्यक्ष, मी पेणकर आम्ही पेणकर शाश्वत विकास समन्वय समिती**

> कोरोना काळात निर्माण झालेली आर्थिक परिस्थिती पाहता रेल्वे सेवा बंद असल्याने एसटीचे तिकीट आम्हाला परवडत नाही. त्यामुळे पेण मधील जवळपास ५० टक्के कामगार प्रवासी बाहेरगावी कामास जाणे बंद झाले आहेत. एसटीचा पेण - पनवेल दिवसाचा तिकीट ४५ रुपये तर ट्रेन चा त्रैमासिक ३७० रुपये असल्याने आम्हाला तो परवडतो, त्यामुळे रेल्वे प्रशासनाने ही शटल सेवा लवकरात लवकर सुरू करावी.
>
> **रामदास पाटील, - निस्वार्थी प्रवासी संघ**

# श्रीवर्धन दांडा येथील स्मशानभूमीला वेलींचा विळखा

## नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिकांमध्ये नाराजी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन दांडा येथील स्मशानभूमीला वेलींचा विळखा पडल्याचे दिसत आहे. त्यामुळे अंत्यविधी साठी जाणाऱ्या नागरिकांना या विळख्याचा त्रास होत असल्याचं दिसून येत आहे. मात्र नगरपरिषद प्रशासनाचे मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याचं दिसत आहे.

शिवसेना उपशहरप्रमुख अजिंकेश भाटकर यांनी याबाबत अनेकदा नगरपरिषदेत सांगून देखील काम होत नसल्याबद्दल नार–ाजी व्यक्त करत अखेर प्रसिद्धी माध्यमातून आवाज उठविण्यासाठी प्रस्तुत प्रतिनिधीला हि माहिती दिली आहे. स्मशानभूमीत वेलींचा विळखा काही एकदिवसात होत नाही. गेल्या अनेक महिन्यापासून हा विळखा तसाच असून येथील स्थानिक लोकप्रतिनिधीच देखील दुर्लक्ष होत असल्याचं दिसत आहे. स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी जाणाऱ्या नागरिकांना अनेक समस्या भेडसावतात. त्यामध्ये रात्रीच्या वेळी याठिकाणचे पथदिवे अनेकदा बंद असतात. तर निसर्गचक्रीवादळात सुरूची झाड तुटल्यामुळे कडक उन्हात बसावं लागत आहे. त्यामुळे याकडे नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन काम करण्याची मागणी जोर धरत आहे.

लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते फक्त खा. तटकरे आल्यावर बाहेर पडतात. जनतेची काम, अडीअडचणी समजून घेण्यात त्यांना काही रस नाही. अशी संतप्त प्रतिक्रिया श्री अजिंकेश भाटकर यांनी दिली आहे.

> श्रीवर्धन दांडा विभागातील बहुतेक कामे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून पूर्ण झाली आहेत. हे जनतेला ज्ञात आहे. त्याचे उत्तर प्रत्येक निवडणूक वेळेला मतपेटीतून जनता देत आली आहे. तसेच विरोधक जनतेची दिशाभूल करून जनतेला भडकवण्याचे काम करीत आहेत. भविष्यात प्रस्तावित असलेली कामे तटकरे यांच्या माध्यमातून लवकर पूर्ण होतील.
>
> **-भावेश मांजरेकर, युवक शहर सचिव, राष्ट्रवादी काँग्रेस, श्रीवर्धन**

# पालीतील सामाजिक कार्यकर्ते उमेश मढवी यांचा भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली, ता. २५ (वार्ताहर) पालीतील सामाजिक कार्यकर्ते व कट्टर हिंदुत्ववादी तरुण उमेश मढवी यांनी रविवारी (ता.२४) भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. पालीतील गुजराती समाज हॉलमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना लाग–लीच भाजप पाली शहर अध्यक्षपदाची धुरा देखील सोपविण्यात आली आहे.



यावेळी उमेश मढवी म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजप–ातील सर्व नेते आणि पेण–सुधागड मतदारसंघाचे आमदार रवींद्र पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपात प्रवेश केला आहे. प्रामाणिकपणे व कर्तव्यनिष्ठपणे दिलेली जबाबदारी पार पाडून पक्ष वाढीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहे. असे देखील मढवी यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमावेळी आमदार रवींद्र पाटील, दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष महेश मोहिते, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटिल, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैशाली मपारा, लोकसभा बूथ संयोजक तथा रोहा मंडळ अध्यक्ष सोपान जांबेकर, सोशल मीडिया दक्षिण जिल्हा संयोजक श्वेता ताडफळे, पर्यावरण रक्षक पंधरावडा संयोजिका रायगड जिल्हा श्रेया कुंटे, सुधागड पाली मंडळ अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर, सरचिटणीस सागर मोरे, महिला मोर्चा अध्यक्ष सुधागड तालुका आरती भातखंडे, सुधागड युवा मोर्चा अध्यक्ष रोहन दगडे, शिरीष सकपाळ , राजेंद्र गांधी, सैनिक सेल अध्यक्ष प्रसाद लखिमळे, अरविंद फणसे, नथुराम सकपाळ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# महापुराच्या काळात मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपणारे खरे योद्धे : खा. सुनिल तटकरे

**दै.रायगड नगरी । रोहा**

गेल्या दोन वर्षात रायगड वासियांना कोरोना महामारी, निसर्ग चक्रिवादळ, तोक्ते चक्रिवादळ तसेच महाडमध्ये महापुराने थैमान घातले. २२ जुलै रोजी रात्रिच्या वेळी पावसाचा जोर वाढत असतानाच आ.अनिकेत तटकरे हाफ पँट घालून घराच्या बाहेर अंधा–या रात्री पडताच मी त्याला विचारले आता रात्री कुठे चाललास? त्यावर आ.अनिकेत तटकरे म्हणाले पावसाचा जोर वाढत आहे आणि महाडच्या नागरिकांना पुराचा विळखा बसत चालला आहे त्यांना ख–या अर्थाने मदतीची गरज आहे. त्यामुळे मी मदतीला बाहेर निघत आहे.माझी काळजी करु नका. त्याचबरोबर ना.अदिती तटकरे गुडघाभर पाण्यातून मदत कशी करता येईल याचा प्रयत्नात पुढे आली. अश्या परिस्थीतीत सकाळपासूनच मदतीचा ओघ महाडवासियांना सुरु झाला. त्यात पाण्याच्या बाटल्या, बुस्किटे प्रथम मदत पोहचत रायगडच्या तमाम सामाजिक संस्था व कार्यकर्ते आणी दानशूर व्यक्तिमत्व पुढे आले. या सर्वांची साथ घेत पुढे अनिकेत तटकरे आणी अदिती तटकरे पुरग्रस्थाना मदत करत होती. त्याचबरोबर चिखल व गाळ काढण्यासाठी स्वत: आ.अनीकेत तटकरे हाफ पँट घा–लून महाडमध्ये तळ ठोकून बसला होता. महाड वासियांना खरी गरज असताना महापुराच्या काळात मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपणारे खरे योद्धे पुढे आले असे विधान खा.सुनिल तटकरे यांनी केले. माणुसकीचा पुर या कार्यक्रमाच्या गौरव प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, उपसभापती रामचंद्र सकपाळ, नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, मराठा समाज नेते प्रदीप आप्पा देशमुख, अनिल भगत, अनंत देशमुख, नंदू म्हात्रे, गोवे ग्रामपंचायत सरपंच महेंद्र पोटफोडे, नगरसेवक राजू जैन, महेंद्र गुजर, वरसे ग्रामपंचायत सरपंच नरेश पाटील, रामशेठ नाकती, रुपेश बामुगडे, महेश बामुगडे व सामाजिक संस्था पदाधिकारी, युवक कार्यकर्ते, सन्मान स्विकारनारे दानशूर व्यक्तिमत्व व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

पुराने कोकण जलमय झाले असतानाच आपल्या माणसांना संकटातून बाहेर काढण्यासाठी शिवछत्रपतींचा मावळा अविश्रांत लढत राहिला असा माणुसकीचा पुर आ.अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन ओम नम:शिवाय सभागृह किल्ला येथे रविवारी २४ ऑक्टोबर रोजी सकाळी करण्यात आले होते.

यापुढे बोलताना खा.तटकरे म्हणाले कि, आ.अनिकेत तटकरे यांनी रोह्यात एक किलोमीटर आपला राष्ट्रध्वज फडकवून गिनिज बुकात नाव नोंदणीसाठी गेले. त्याचबरोबर ७५ व्या स्वतंत्र दिनी रोह्यात ७५ राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण तळागाळातील विविध व्यक्तींच्या हस्ते केले व समाजासमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला. जे मलाही कधी सुचलं नाही. आताची पिढी खुप प्रगत आहे. देश प्रगती पथावर असताना युवापिढी संघर्षमय वातावरणातून पुढे येताना दिसते. रोहा तालुक्यातून भरघोस मदत महाड व चिपळूण वासियांना गेली. मात्र मी जेव्हा चिपळूणला गेलो तेव्हा तेथील नागरिकांनी खा. शरद पवार साहेबांना भेटायचे आहे असा टाहो फोडला होता. त्यांचे असे म्हणणे होते कि, मदत कशी मिळवून द्यायची हे खा.शरद पवारच जाणू शकतात. महत्वाचे म्हणजे येथील सर्व उपस्थीत शिख धर्मीय, सामाजिक संस्था, महिला मंडळ, दानशूर व्यक्तिमत्व यांनी केलेल्या मदतीने महाडकर सावरले.

# माथेरान मधील विविध विकासकामांचा लोकार्पण आणि भूमिपूजन कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान गिरीस्थान नगरपरिषद येथील विविध विकास कामांचा लोकार्पण व भूमिपूजनसोहळा राज्याचे पर्यटन,पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे, श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे आदेश बांदेकर, मावळ मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे, मुंबई महापौर किशोरी पेडणेकर, स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकार, माथेरान हेरीटेज कमिटी चेअरमन एस. बी. पाटील उपस्थित होते.

यावेळी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की माथेरान वर माझे विशेषतः प्रेम असून इथला निसर्ग खूपच पाहण्यासारखा आहे. या गावाला अन्य पर्यटनस्थळ प्रमाणे दवाखान्यात योग्य त्या सोयीसुविधा उपलब्ध होतील लवकरच नगरपरिषदेच्या अखत्यारीत असलेल्या या दवाखान्याला नवसंजीवनी प्राप्त करून देण्यासाठी आम्ही सर्व उपस्थित मंडळी नक्कीच प्रयत्न करू असे स्पष्ट केले माझी वसुंधरा मोहिमे अंतर्गत बिल्ले, घडीपत्रिका व स्टिकरचे प्रकाशन आदित्य ठाकरे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याधिकारी सुवर्णा भणगे यांनी केले. या कार्यक्रमात नागरिकांनी उपस्थिती दर्शवली तसेच भाजपचे सर्व नगरसेवक नगरसेविका, गटनेते प्रसाद सावंत, शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, काँग्रेसचे शहर अध्यक्ष माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, नगरसेवक शिवाजी शिंदे यांसह विविध मंडळाचे पदाधिकारी, आजी माजी लोकप्रतिनिधी, व्यापारी, दुकानदार उपस्थित होते.

# प्लॅस्टिक गोणी बॅगची डिलेव्हरी न घेता केली जवळपास ४५ हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काजूचा व्यापारी असल्याचे भासवून १ हजार प्लॅस्टिक गोणी बॅगची ऑर्डर देऊन सदर ऑर्डरची डिलेव्हरी हि एका बंद गाळ्यात घेऊन व मालाचे पैसे न देता फसवणूक केल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

सचिन सावंत यांचा प्लॅस्टिक गोणी बनविण्याचा कारखाना असून त्यांना आरोपी विपूल जैन याने जवळपास १ हजार प्लॅस्टिक गोणी बॅगची ऑर्डर दिली होती व सदर ऑर्डरची डिलेव्हरी अस्तित्वात नसलेल्या हायटेक शिपींग इंडस्ट्रीज फॅक्टरी या पत्त्यावर न घेता पावसाचा बहाना करून या गुन्ह्यातील इतर दोन आरोपींनी तालुक्यातील तोंडरे गाव येथील गाळा नं–७१/५० लोटलीकर कंपाऊंड या बंद गाळ्यात डिलेव्हरी घेतली व मालाचे पैसे न देता आपसात संगनमत करून सचिन सावंत यांची जवळपास ४५ हजारांची फसवणूक केल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.


### पाचवे पुण्यस्मरण

**भावपूर्ण आदरांजली**



**स्व. राणाप्रतापसिंह सुंदरसिंह परदेशी**

जन्म – ८ जून १९४७

मृत्यू – २६ ऑक्टोबर २०१६

**मनोजसिंह राणाप्रतापसिंह परदेशी आणि समस्त परदेशी कुटुंबीय**